## दिनांक ८ जानेवारी, २०२५ रोजी 'मिशन : एनिमिया फ्री इंडिया' कार्यक्रमाचा अहवाल.

दिनांक ८ जानेवारी, २०२५ रोजी 'मिशन : एनिमिया फ्री इंडिया' अंतर्गत महिला विकास कक्ष, मुंबई विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना आणि भारत विकास परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ परिसरातील सर्व विद्यार्थिनी आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर महिला कर्मचा-यांसाठी रक्त तपासणीचा कार्यक्र आयोजित करण्यात आला होता. ज्या महिला रक्त तपासणिस आल्या त्या सर्व महिलांना चणे आणि गुळ वाटण्यात आले. या उपक्रमास अनुसरून महिला विकास कक्ष, मुंबई विद्यापीठ यांनी कॉमरेड गोदावरीबाई शामराव पारूलेकर कला, वाणिज्य आणि विज्ञान आदिवासी महाविद्यालय, तलासरी येथे सुध्दा रक्त चाचणीचे कार्यक्रम आयोजिले होते.

परिवार, समाज आणि त्या नंतर राष्ट्र निर्मितिच्या क्षेत्रात महिलांचे योगदान महत्वपूर्ण असून, समाज आणि स्त्रिया स्वत: त्यांच्या निरामय स्वास्थाच्या प्रति जाकरूक नसतात. स्त्रियांच्या स्वास्थ्या प्रति निष्काळजीपणा फक्त परिवारास नाही तर समाज आणि राष्ट्रास हानिकारक आहे. या बाबिस लक्षात घेवून मुंबई विद्यापीठाच्या महिला विकास कक्षाने राष्ट्रीय सेवा योजना आणि भारत विकास परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ८ जानेवारी, २०२५ रोजी 'मिशन : एनिमिया फ्री इंडिया' अंतर्गत सवित्रीबाई फुले मुलिंचे वसतिगृह या ठिकाणी विद्यापीठ परिसरातील सर्व विद्यार्थिनी आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर महिला कर्मचा-यांसाठी रक्त तपासणीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता तदुपरांत कॉमरेड गोदावरीबाई शामराव पारूलेकर कला, वाणिज्य आणि विज्ञान आदिवासी महाविद्यालय, तलासरी येथे परिसंवाद कक्षामध्ये सुध्दा रक्त चाचणी झाली होती.

या कार्यक्रमात विद्यापीठ परिसरातील सर्व विद्यार्थिनी आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर महिला कर्मची मिळून ४५० पेक्ष अधिक महिलांची रक्त चाचणी करण्यात आली आणि कॉमरेड गोदावरीबाई शामराव पारूलेकर कला, वाणिज्य आणि विज्ञान आदिवासी महाविद्यालय, तलासरी येथे जवळपास ८५० महिला कर्मचारी आणि विद्यार्थिनींची रक्त चाचणी करण्यात आली . हया रक्त तपासणीच्या कार्यक्रमात जवळपास ७० टक्के महिला एनेमिक असल्याचे आढळले. ज्या महिला एनेमिक आढळल्या त्यांना २ महिन्यांचे औषद दिले गेले. २ महिलन्यांनंतर एनेमिक आढळलेल्या सर्व महिलांची पुन्हा रक्त तपसणी केली जाणार आणि जो पर्यंत त्यांच्या हिमोग्लोबीनची पर्याप्त पातळी होत नाही तो पर्यंत त्यांचे उपचार विनामुल्य केले जाईल.

हया रक्त तपासणी शिबिराचा दुसरा टप्पा जागतिक महिला दिन ८ मार्च, २०२५ रोजी आयोजित करण्यात येईल.

हया शिबिराला मुंबई विद्यापीठाचे विद्यानगरी परिसर आणि कॉमरेड गोदावरीबाई शामराव पारूलेकर कला, वाणिज्य आणि विज्ञान आदिवासी महाविद्यालय, तलासरी च्या परिसरात भरगोस प्रतिसाद मिळाला.

प्रा. उर्वशी मनुप्रसाद पंड्या
कार्याध्यक्ष
महिला विकास कक्ष
मुंबई विद्यापीठ
दिनांक : १६ जानेवारी, २०२५.















NSS





